# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई – 400703. /9632

## परिपत्रक

विषय :– **सन 2022 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांवनोंदणी अर्ज क.17, व मुळकागदपत्रे वितरण केंद्रावर जमा करणेबाबत...**

या परिपत्रकाव्दारे सर्व मान्यताप्राप्त खाजगी सपंर्क केंद्रशाळा/कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, सन 2022 मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांवनोंदणी अर्ज क.17, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबतच्या पोचपावत्या, विद्यार्थ्यांच्या याद्या व मुळकागदपत्रे **मंगळवार दिनांक 02/11/2021 रोजी** शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व नियमांचे व सूचनांचे पालन करून आपणांस **नेमून दिलेल्या वितरण केंद्रावरच जमा करण्यात यावीत.** वाशी कार्यालयात वाशी संकलन केंद्राव्यतिरिक्त इतर खाजगी सपंर्क केंद्रशाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे अर्ज व इतर कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत. त्यामुळे आपणांस देण्यात आलेल्या वितरण केंद्रावरच अर्ज कमांक 17 व संबंधित कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

## कागदपत्रे खाली दर्शविल्याप्रमाणे जमा करण्यात यावीत.

1) निर्धारित दिनांकास मंडळात अर्ज सादर करताना अर्जावर अचुक कमांक ( ०१ पासून .........) नोंद करून एकत्रितरित्या सादर करावे. अर्जावरील अनुकमांक व विद्यार्थ्यांच्या यादीतील कमांक एकच असावा. शुल्क जमा केल्याबाबतच्या पोचपावत्या न चुकता सादर कराव्यात.
2) परराज्यातील विद्यार्थ्यांचे Eligibility Certificate आवश्यक असलेले अर्ज गठठयात शेवटी ठेवावे. तसेच योग्यता प्रमाणपत्राची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.
3) सर्व विद्यार्थ्यांच्या **मुळकागदपत्रांच्या मागील बाजूस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक कमांक व परीक्षेचे वर्ष न चुकता नमूद करावे.** तसेच मुळकागदपत्रांसोबत छायाप्रतीही जोडाव्यात.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक,
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई – 400703